REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# स्त्री आणि स्त्रीवाद : एक दृष्टिक्षेप

प्रा. करूणा व. डहाके
समता शिक्षण महाविद्यालय, मोवाड,
जि. नागपूर.

## प्रस्तावना :–

आज आपण २१ व्या शतकात पदार्पण करून ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानात प्रगती करून उन्नतीच्या अत्युच्च शिखरावर जाऊन पोहचलो असलो तरी सुद्धा स्त्री समस्येच्या मुळापर्यंत अद्यापही पोहचलो नाही. परंपरागत स्त्रीजीवनातील बऱ्याच अन्यायकारक बाबी मागे पडल्या असल्या तरी सुद्धा अजूनही स्त्री स्वतंत्र्य व्यक्ती म्हणून जीवन जगत नाही. त्यामुळे निसर्ग आणि समाज व्यवस्था यामुळे स्त्रीची जी घडण झाली तीच मुळाच तपासण्याची गरज आहे. त्या दृष्टीनेच स्त्रीवाद ही संकल्पना साहित्याच्या पातळीवरून समजून घेण्याचा हा अल्पसा प्रयास आहे.

## स्त्री आणि स्त्रीवाद :–

'मनुष्य' म्हणजे सृष्टीतील एकमेवाद्वितीय सुंदर मूल्य असून स्त्री व पुरूष या संसार रथाची दोन मजबूत चाके आहे. या संसार रथात दोन्ही चाके सारखीच महत्वपूर्ण आहेत. एक चाक जरी घसरलं तरी हा रथ पुढे चालणार नाही. हे साधं सरळ गणित कळायला आपल्याला **२१** व शतक सुद्धा कमी पडलं आणि दुभार्ग्य अस आज आपण स्त्री जन्मच नाकरतो आहे ! असं का ? पण स्त्री जीवनाचा इतिहास पाहू जाता असं लक्षात येते की, आपली वैदिक संस्कृती मुळात मातृसत्ताक होती. वेदकाळात स्त्रिया कुटुंबाच्या सुत्रधारक होत्या. कुटुंबपध्दतीचा महत्त्वाचा घटक होत्या. कुटुंबाचा संपूर्ण कारभार व्यवस्थित सांभाळून वेदाभ्यासही करीत होत्या हे ऋग्वेदातील गार्गी, मैत्रेयीच्या ऋचेवरून दिसून येते. स्त्रियांनीच शेतीचा शोध लावला ती संरक्षण खात्याची अधिकारीही होती पण काही काळानंतर आर्यांनी अत्यंत कुटनितीने आक्रमण करून कर्तृत्ववान महिलांना सिंहासनावरून हटवले व आपल्याकडे सत्ता ओढून घेतली. स्त्री ही पुरूषांपेक्षा मानसिकदृष्टया अधिक सक्षम आहे हे जेव्हा धर्ममार्तंडांना समजले तेव्हा त्यांनी सर्वप्रथम स्त्रियांवर सर्वात जास्त धार्मिक बंधने लादलीत मग हिंदु धर्मव्यवस्था निर्माण केली. त्यातूनच वर्णव्यवस्था उदयाला आली आणि वर्णव्यवस्थेतून हळूहळू जातीव्यवस्थाही आकार घेऊ लागली आणि चार्तुवर्णिय समाज व्यवस्थेचा उदय झाला. अशाप्रकारे आर्यांनी आपल्या सोयीनुसार हवी तशी व्यवस्था निर्माण करून घेतली व स्त्री बंधनात अडकली गेली ती कायमचीच.

वर्तमान काळात आजही खासी, गारो, नायर यासारख्या आदिवासी जमातीमध्ये मातृसत्ताक कुटुंबपध्दती व वधुमूल्य पद्धती अस्तित्वात आहे हा गौरवशाली इतिहास विसरून चालणार नाही.



'न स्त्री स्वातंत्र्यंम् अहर्ति' या मनुवचनाला स्त्रीने केव्हाच कालबाहय ठरविले आहे. तरीही अजुनही स्त्री मानसिकदृष्टया सक्षम आहे काय ? याच्या उत्तरार्थ चिकित्सक दृष्टीने विचार केल्यास असे दिसून येते की, स्त्रीला वेलीची उपमा दिली जाते. वेल उभी राहते ती आधारानेच त्याचप्रमाणे स्त्री लहानपणी पित्याच्या, मोठेपणी पतीच्या, म्हातारपणी पुत्राच्या आधाराने उभी राहते. तिला स्वतःच स्वतंत्र अस्तित्वच नाही तिला लागणारी कपडेलत्ते ही घरच्या कर्त्यापुरूषांची

मर्जी होईल तेव्हा आणून दिल्या जाते. कधी कधी तर तिला दागदागिन्यांनी मढविली जाते ते घरच्या पुरूषांच्या प्रतिष्ठेचे दर्शन घडविण्यासाठीच पण वास्तविक परिस्थिती पाहता घरच्या सुतळीच्या सडयावरही तिचा अधिकार नसतो. 'चुल आणि मूल' एवढंच तिच कार्यक्षेत्र असते आणि दुसरीकडे मात्र 'यंत्र ना वस्तू पूज्यन्ते, रमन्ते तंत्र् देवता' असे मानून तिला देवत्व बहाल केले गेले. लक्ष्मी, सरस्वती, दुर्गा, काली अशी विविध नावाभिमाने देवून तिला पूज्यनिय ठरविले गेले, तिला महान देवत्व प्रदान केल गेलं.

आज भारतात देवीची करोडो रूपयांची मंदीरे आहे आणि त्या देवीच्या शक्तीपुढे माणूस नतमस्तक होतो पण घरच्या कुटुंबातील स्त्रियांचा मात्र अपमान करतो. तिची विटंबना करतो, सरळ सांगायचे तर माणूसकीचा खरा धर्मच तो विसरत चालला आहे अाणि दुसरीकडे मंदिरातील देवीची पुजा करण्याचाठी त्याला मज्जाव नाही. मग स्त्रीयांना का ? धर्म माणसासाठी की, माणूस धर्मासाठी हेच कळत नाही. घरातील चार भिंतीच्या आत मुलगी, नात, सून, बहिण, पत्नी, आई या विविध भूमिका व्यवस्थित निभवत असतांनाही पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात तिने पदार्पण केले असूनही आज स्त्रीला समानतेचा दर्जा मिळाला नाही. पुरूषप्रधान सामाजिक वृत्ती पूर्णपणे बदलली गेली नाही. महिलांना अनेक प्रकारचे अत्याचार सहन करावो लागते. तिच्या बाजूने अनेक प्रकारचे कायदे असूनही समाजात काही ठिकाणी तिच्या अब्रूचे धिंडवडे निघतांना दिसते कारण एक उपभोग्य वस्तू म्हणून तिच्याकडे पाहिल जाते. याचे जिवंत उदारहरण म्हणजे आताच घडून गेलेलं मन हादरवून टाकणारं 'असिफा' प्रकरण. असिफा या कोवळया मुलीवर सतत बलात्कार केला गेला व नंतर तिला जिवंत मारून टाकल्या गेल आणि तिचे आरोपी मात्र आजही बाहेर मोकाट फिरताहेत कारण त्यांना सोडवण्यासाठी राजकीय पक्ष आरोपींच्या पाठीशी खंबिरपणे उभा आहे. हे माणूसकीला काळीमा फासणरं केवढं मोठं प्रकरण आजही समाजात घडताहेत आणि दुसरीकडे मात्र डिजीटल इंडियाच स्वप्न सत्यात साकारू पाहते हा केवढा मोठा विरोधाभास ! एकीकडे 'बेटी बचाओ' हा नारा आहे की धमकी हेच समजत नाही. आजही समाजात रावणप्रवृत्तीचा जन्म होतांना दिसतो पण आजही तोच रावण आजच्या विकृत पुरूषी वासनांपेक्षा बरा होता. जो सितेला कैदेत ठेवूनही सीता सुरक्षित होती आणि स्वतःच्या बहिणीवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा बदला घेण्यासाठी त्याने प्रयत्न केला आणि बहिणीच्या पाठीमागे सक्षमपणे उभा राहिला पण त्याने सीतेसारख्या परस्त्रीला सुरक्षित ठेवले.

वास्तविक परिस्थितीचा विचार केला तर पूर्वीपासूनच आपल्या इतिहासात फक्त मुले घडविले जसे जिजाऊने 'शिवबा' घडवला, श्यामच्या आईने 'श्याम' घडवला, 'राम' घडला, 'कृष्ण' घडला. पण श्यामच्या आईला श्यामली का घडविता आली नाही? जिजाऊने शिवबा घडवला पण जिजाऊही घडलीच ना ! मग जिजाऊ का कुणाला घडविता आली नाही ? आज समाजात स्त्रीला स्त्री पुरूष समानतेसाठी लढावे लागते, मुलीला तिच्या स्वत्वासाठी भांडावे लागते कारण 'स्त्री जन्माला येत नाही तर ती घडविली जाते.''[1] हे सिमॉन द बोव्हाचे 'द सेकंडसेक्स' मधील विधान अगदी सार्थ वाटते. स्त्री अबला नसून सबला आहे. स्वतःतील शक्ती ओळखण्यासाठी तिला तिच्या अस्तित्वाच्या लढयासाठी स्त्रीवादाचा उदय होतांना दिसतो. तिला आतापर्यंत दिल्या गेलेल्या दुय्यम वागणूकीमुळे तिच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी केलेला हा प्रयत्न म्हणजे 'स्त्रीवाद' होय.

स्त्रीवाद हा मुख्यतः पाश्चांत्याकडून आयात केलेला विचारव्युह असला तरी तो जगातील सगळयाच स्त्रियांना लागू होऊ शकतो. 'स्त्रीवादी साहित्याचा इतिहास' या ग्रंथात डॉ. सोनल भामरे स्त्रीवाद मांडतांना म्हणतात, ''स्त्रियांनी स्वतःच्या अस्तित्वासाठी, हक्कासाठी, आत्मसन्मानासाठी चालवलेली लढाई म्हणजे स्त्रीवाद होय.''[2] स्त्रीवाद ही एक सुसंवादी अशी प्रभावी विचारप्रणाली आहे. 'स्त्रीवाद' या शब्दात अनेक सामाजिक सिध्दांन्त, राजकीय चळवळी आणि नैतिक प्रणाली एकवटलेल्या आहेत. त्या सर्वांचे उद्दिष्टय स्त्रीचे स्वातंत्र्य हे आहे. स्त्रीवादाचे स्वरूप स्पष्ट करतांना डॉ. आश्विनी घोंगडे आपल्या 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन' पुस्तकात म्हणतात, स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून दूर जाणे, त्यांच्याविरूद्ध वागणे नव्हे किंवा स्वतःचा वेगळा सुभा निर्माण करणे असेही नव्हे, तर परंपरेने संस्कृतीच्या हजारो वर्षापासून स्त्रीला एक व्यक्ती म्हणून एक मानव म्हणून नकार दिला जावून किडया मुंग्याप्रमाणे जगण्यास भाग पाडले, पायातील चप्पल समजून ती हिनतेची वागणूक दिली त्या विरोधात उभे राहणे एवढेच नव्हे तर इतिहासाने बाईचे मानवपण

नाकारून तिला जी पशुतूल्य अवस्था प्राप्त करून दिली आहे. त्यातून बाहेर पडून आपले स्वतःचे हक्क अधिकार मागून घेण्यासाठी तयार केलेले हे व्यासपीठ म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय आणि स्त्रीवाद हा तिला स्वतःच्या स्वातंत्र्याची जाणीव करून देणरा मानवी हक्क आहे''.[3] स्वातंत्र्य, समता, बंधूता ही घटनेने मूलभूत अधिकार म्हणून प्रदान केले असले तरी ज्या दिवशी स्त्री पुरूष स्वतंत्र जीवन जगून मोकळेपणाने श्वास घेऊ शकेल आणि आपले जगणे भोगणे शब्दात मांडू शकेल. तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्रीवादी चळवळीचे सार्थक होईल.

**१९७५** हे वर्ष स्त्रीदशक म्हणून जाहीर केलं आणि जगभर स्त्री प्रश्नावर विचार सुरू झाला त्याचाच परिणाम भारतातही त्यादृष्टीने विचार मंथन झाले आणि त्याचेच प्रत्यक्ष पडसाद म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळीने जोर धरला. स्त्री अस्तित्वाच्या मुळाशी असणाऱ्या सर्वच प्रश्नावर अगदी महागाईच्या प्रश्नांपासून तर हुंडाबळीच्या प्रश्नांपर्यंतच्या सगळयाच प्रश्नांना स्त्रीमुक्ती चळवळींची हात घातला. 'स्त्री ही माणूस आहे' हया एकमेव गृहितकावर स्त्री पुरूष समानतेचा आग्रह स्त्रीमुक्ती चळवळींनी धरला आणि याचेच थेट परिणाम साहित्यावर दिसून आले कारण साहित्य सामाजिक परिस्थिती चित्रीत करण्याचे प्रभावी माध्यम असल्याने स्त्रीवाद साहित्यातून प्रत्यक्ष समाजमनावर बिंबत गेला आणि भारतात **१९६०** नंतर स्त्रीवादी साहित्याचा उदय झाला. साहित्यातून स्त्रीवादाची सुसुत्र मांडणी करणारा **१९४९** चा सिमॉन द बोव्हाचा 'द सेकंडसेक्स' हा ग्रंथ आणि **१९८३** चा 'मानवी हक्काचा जाहिरनामा' आणि भारतातील ताराबाई शिंदेचा 'स्त्री पुरूष तुलना' हा दीर्घ निबंध स्त्रीवादी वाटचालीस प्रेरणादायी ठरला. पुढे महात्मा फुलेंनी 'स्त्री पुरूष तुलना' या ग्रंथाची दखल घेवून स्त्रियांच्या अस्तित्वासाठी अखंड प्रयत्न सुरू ठेवले त्याचा प्रत्यक्ष परिणाम स्त्रीवादी साहित्याने जोम धरला. स्त्रीनेच स्त्रीच्या व्यथा वेदना साहित्याच्या पातळीवर मांडून स्त्रीला स्वत्वाची जाणीव झाल्याचे सिद्ध केले. साहित्यातून तिची होणारी पिळवणूक, तिची मानसिक घुसमट व्यक्त होऊ लागली हा प्रभावी प्रयत्न विभावरी शिरूरकरांपासून झाला त्यानंतर कमला देसाई यांनीही कथाकादंबरीतून धीट व स्वतःचा आत्मसन्मान जपणारी स्त्री रेखांकित केली. 1980 नंतर गौरी देशपांडे, मेघना पेठे, सानिया, आशा बगे, रेखा बैजल, कविता महाजन, अरूणा सबाने इत्यादी स्त्रीवादी लेखिकांनी स्त्रीच्या अस्मितेचा शोध साहित्यातून घेवून या पुरूषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांच्या कौटुंबिक आर्थिक, सामाजिक, राजकीय अस्तित्वाची मांडणी स्त्रीवादी साहित्यातून केलीत.

'स्त्री लिखित साहित्य : संदर्भ आणि चिकित्सा' या ग्रंथात आशुतोष पाटील म्हणतात, ''एक स्त्री म्हणून स्वतःचे व्यक्तित्व – मनुष्यत्व व्यवस्थेच्या अनेक पदरी, चिरेबंदी नटबंदी आड घुसमटत आहे हे लक्षात येत गेले. सावित्रीबाई फुले यांच्या समाजकार्यात आणि ताराबाई शिंदे यांच्या वैचारिक मांडणीतून ते सुस्पष्ट होत गेले. पुढच्या टप्प्यावर विभावरी शिरूरकर यांच्या कथा कादबऱ्यांमधून स्त्री जीवनाच्या वरच्या स्तरात का होईना, पण थोडी खळबळ माजण्यास अवसर प्राप्त झाला. फुले – शाहू – आंबेडकर यांच्या प्रखर मानवतावादी विचारधारेतून आणि कृतिशीलतेतूनही याशिवाय महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील आदींच्या शिक्षणविषयक महत्कार्यातून बहूजन, दलित आणि स्त्री यांच्यातील आत्मभान जागृतीच्या प्रक्रियेला दिशा व गती प्राप्त झाली. या समाज स्थित्यंरातून स्त्रीच्या जगण्याला मनुष्यत्वाचे अंग लाभण्याच्या शक्यता अधिकतेने जाणवू लागल्या. उंबरठयाबाहेरच्या जगातील सामाजिक व्यवहारात स्त्रीचा काही एक सहभाग असू शकतो याची चाहूल जाणवू लागली.''[4] यातून स्त्रीवादी विचारांची रूजवणूक कशी झाली. साहित्याच्या पातळीवर ती कशी आली एकंदरीत स्त्रीचे अस्तित्वभान कसे जागृत झाले हे दिसून येते.

## सरांश :–

स्त्रीवाद एक मानवीय जाणीव असून स्त्रीच्या दृष्टीकोनातून जीवनाच्या विविध पैलूंवर टाकलेला एक दृष्टिक्षेप आहे. स्त्रियांच्या हक्कांचे अविष्कारांचे समर्थन करण्याचे हे विचारसूत्र आहे. स्त्रीच्या सर्वांगीण मुक्तीचा विचार करणारी विचारप्रणाली आहे.

**संदर्भग्रंथ :–**


1) गोखले करूणा (अनुवाद), 'द सेकंड सेक्स सिमाने द बोव्हुआर', पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली, 9 मे 2010

2) भामरे डॉ. सोनल, 'स्त्रीवादी साहित्याचा इतिहास', प्रशांत पब्लिकेशन्स जळगांव, प्रथम आवृत्ती मार्च 2015, पृ. 10

3) घोंगडे डॉ. आश्विनी, 'स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि. पुणे, 1993.

4) पाटील आशुतोष (संपादक), 'स्त्री लिखित साहित्य संदर्भ आणि चिकित्सा' ,शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, आवृत्ती पहिली, 11 जून 2018, पृ.क्र. 7.

5) महाजन डॉ. वंदना, 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य', विजय प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती, 1 नोव्हेंबर 2013.





**प्रा. करूणा व. डहाके**

**समता शिक्षण महाविद्यालय, मोवाड, जि. नागपूर.**